## कार्यवृत्त १९८९-९०

# 'स्व'-रूपवर्धिनी

# सुहृदांचे सेवेसी

*सर्वसामान्यांचे प्रश्न, भरीस भर म्हणून वाढती गुंडगिरी, मारामाऱ्या, चित्रपट, दूरदर्शन आदींचा अनिष्ट परिणाम तसेच संधीचा अभाव या साऱ्या चक्रव्यूहातच आमचे बाल अभिमन्यू गुंतून पडले आहेत. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांना सन्मानाने उभे करणे आवश्यक आहे.*

*या बालवीरांमध्ये असलेले सुप्त गुण आपुलकीच्या भावनेने फुलवून त्यांच्या कर्तृत्वाला नव्या वाटा मोकळ्या करून देण्याचा 'स्व'रूप वर्धिनी' हा एक प्रयत्न! पण हे सारे करीत असतांना समाजाशी, राष्ट्राशी असलेले त्याचे ममत्व कृतीच्या रूपाने बाहेर यावे हा उद्देश.*

'स्व'रूपवर्धिनीची 100 प्रति.

BOLD TYPE

# प्रार्थना . . .

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥


हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥१॥


जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीहि तेजस्विनी
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती - ध्यास हा ॥३॥

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥

❁ ❁



आमच्या सेवाकार्याची प्रेरणा केवळ करुणा वा सहानुभूती ही न राहता, जीव हा खरोखर शिवस्वरूपी आहे आणि जीवसेवा ही शिवपूजाच आहे. या भावनेने आम्ही सेवाकार्य करावयास हवे.

– श्री. रामकृष्ण परमहंस

# 'स्व'रूप वर्धिनी

**म्हणजेच . . . . . . . .**

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्या द्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ.
- आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपला वाटणारा परिवार.
- विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकवणारी कार्यशाळा.
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प'
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी आपुलकी निर्माण करणारी संघटना
- शाळेत प्रतिज्ञा फक्त म्हणून घेतली जाते. ती प्रतिज्ञा अंगी बाणावी, भिनावी व कृतीतून पाझरावी यासाठी शिक्षणमाध्यमातून देशाची गरज पूर्ण करू इच्छिणारा दूरलक्ष्यी उपक्रम
- अर्थात, ही पूर्ण वेळेची शाळा नाही, शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प.

## या विचारांची प्रचीती वर्धिनी घेत आहे

स्वामी अखंडानंदांनी भागलपूरहून स्वामी विवेकानंदांना अमेरिकेस एक पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी असा विचार मांडला होता की, 'भागलपूर येथील वातावरण शिक्षण संस्थेसाठी योग्य असल्यामुळे तेथे एक शिक्षण संस्था स्थापन करावी.' त्याला स्वामी विवेकानंदांचे आलेले उत्तर अतिशय मार्मिक व 'स्व'रूप वर्धिनीसारखे काम करणाऱ्या संस्थांना योग्य दिशा दाखविणारे आहे.



चारित्र्य घडविणारे, मानसिक बल वाढविणारे, बुद्धी विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे असे शिक्षण आम्हांस हवे आहे.

— स्वामी विवेकानंद

कॅलिफोर्निया
२१ फेब्रुवारी १९००

प्रिय अखंडानंद,

तुमचे पत्र मिळाले आणि सविस्तर हकीगत वाचून अतिशय आनंद झाला. हृदय हेच सर्व सामर्थ्याचे खरेखुरे अधिष्ठान होय! ज्ञान, बल, क्रिया यांनी युक्त असा आत्मा मेंदूत नव्हे हृदयात विद्यमान असतो! मेंदूची भाषा ही फक्त थोड्यांनाच समजते. हे जाणून घ्या की, एक दोन खेड्यांचे साधलेले हे हित, वीस मुलांचे अनाथबालगृह, हे दहावीस कार्यकर्ते, ही पुरेशी आहेत. हेच कार्याचे कधीही नष्ट न होणारे बीज आहे. ह्याच्यायोगे कालान्तराने लाखो लोकांचे हित होईल. आता आपल्याला सिंहाच्या शक्तीने काम करणारी निवडक सातआठ माणसे हवी आहेत, म्हणजे मग शेकडो सामान्य माणसेही उत्तम कार्य करू शकतील.

... प्रत्येकाने स्वतःच आपला उद्धार करून घेतला पाहिजे' हे तत्त्व सर्व क्षेत्रांना लागू आहे. त्यांनी स्वतःच आपले कार्य करावे ह्यासाठी आपण त्यांना मदत करतो. जय गुरु! जय जगदंबे! भय कसले? संधी, उपाय व योजना ही सर्व आपोआप जुळून येतील. शाबास! वा बहाद्दर! गुरुदेव तुमच्या हृदयात विराजमान असोत आणि जगदंबा तुमच्या हातून कार्य करवून घेवो.

तुमचा विवेकानंद

With Best Complimnents From :

**M/s. Decent Decorators**
For Quality Coatings

81 - D - 2. M.I.D.C. Chinchwad,
PUNE 411 009.
Phones : 83730, 82333, 55417

## प्रेरणादायी आशीर्वाद

ध्येयाकडे वाटचाल करतांना मान्यवरांचे आशीर्वाद, भेटीला आलेल्यांचे अभिप्राय मोलाचे ठरतात व पुढच्या वाटचालीस उभारी आणतात. म्हणूनच ज्येष्ठ समाजसेविका अंगणवाडी प्रकल्पाच्या अध्वर्यु पद्मश्री श्रीमती अनुताई वाघ यांचे आशीर्वाद प्रेरणादायी वाटतात.

▸▸▸

प्रति,

श्री. शिरीष पटवर्धन,
सहकार्यवाह
'स्व'रूप वर्धिनी, पुणे.

स. न. वि. वि.

आपला निरोप घेऊन पुणे येथून तरूण युवक तुकडी आली. आमच्या संस्थेचे काम आवर्जून पाहिले. संस्थेच्या कामाविषयी माहिती करून घेतली.. आवडले.

आपल्या संस्थेत मी एकदा आले होते, असे आठवते. मात्र नक्की कधी ते सांगता येत नाही.

स्वरूपवर्धिनीच्या एकूण कामाची कल्पना होती. ती अहवाल वाचून स्पष्ट झाली. स्वतःची कामे सांभाळून शक्य ती समाजसेवा आपण करीत आहात. आनंद वाटला. असेच काम पुढेही चालू रहावे. नवीन नवीन भावनाशील कर्तृत्ववान युवापिढी आपल्या मदतीसाठी पुढे यावी ही सदिच्छा.

आपली नम्र,

**अनुताई वाघ.**
दि. १५/११/८९. कोसबाड

## प्रेरणा - शोध आणि बोध

दर सुट्टीमध्ये होणाऱ्या शिबिरामध्ये एकमेकांच्या सहवासातून व वेगळ्या विषयांच्या मांडणीतून मुले काही चांगले शिकत असतात. अशाच काही प्रतिक्रियांचे संकलन —

- आळस सोडून परिश्रम केल्याशिवाय यश मिळत नाही. तेव्हा मी सतत धडपडत राहीन.
- संघटनेमध्ये काम करताना 'Their need is Greater' हे तत्व अनुसरल्यास पुष्कळ प्रश्न सुटण्यास मदत होते.
- आज देशात एवढी बिकट परिस्थिती असताना आपण झोपा काढतो याची लाज वाटते.
- मी आजच्या जगाप्रमाणे न बनता सावरकर, स्वामी विवेकानंद यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मातृभूमीची सतत आठवण ठेवीन.
- आपणही मोठेपणी अशीच वर्धिनी काढून गरीब मुलांना ज्ञान द्यावे व देशाचे भवितव्य उज्ज्वल घडवावे.
- आई-वडील आणि 'स्व'रूपवर्धिनी यामध्ये आता



मला राज्यभोगाची इच्छा नाही, स्वर्गसुखाची किंवा पुनर्जन्माचीही लालसा नाही. पीडितांचे दु:ख नाहीसे करावे अशी इच्छा मात्र आहे.

**— स्वामी अखंडानंद**

अंतर पडू द्यायचे नाही, कारण स्वतःची प्रगती साधून दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी स्वतःची कंबर कसावयाची आहे.

- मी निदान दोन वर्षे तरी समाजसेवेसाठी पर्यायाने वर्धिनीसाठी देईन.

▸▸▸

## अशी भावली वर्धिनी

**वर्धिनीला भेट दिल्यानंतर येथील प्रसन्न आनंददायी वातावरण सर्वांनाच भावून जाते. संस्थेचे वेगळेपण सर्वांनाच जाणवते. वर्धिनीच्या संपर्कात आलेल्यांच्या या काही प्रतिक्रिया.**

*८ मार्च १९९०*

*मा. श्री. पटवर्धन सर व लेले महोदय यांना,*
*सस्नेह नमस्कार.*

*..'स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे मूर्त स्वरूप म्हणजे आपल्या केंद्राचे विविध उपक्रम.' विद्यार्थ्यांच्या आकांक्षांची तृप्ती, सामाजिक गरजांची पूर्ती या उपक्रमातून घडल्याचे जाणवले.*



*व्यक्तीतील जीवन, मन आणि आत्मा यांचा संबंध राष्ट्रीय जीवन, मन; आत्मा यांच्याशी उचित प्रकारे जोडून त्या व्यक्तीस स्वतंत्र असूनही राष्ट्राचा अविभाज्य घटक असल्याचा साक्षात्कार जे करविते ते खरेखुरे शिक्षण होय.*

***— योगी अरविंद***

*'मातीतून तेजस्वी मोती' निर्माण करण्याचे सामर्थ्य संचालक, कार्यकर्ते यांच्यामध्ये निश्चितच आहे याची खात्री झाली. विद्यार्थी, पालक व समाज यांना घडविण्यात आपण फार मोलाची कामगिरी केली आहे. 'आत्म-साक्षात्कार' यापेक्षा वेगळा काय असतो?*

*विद्यार्थ्यांविषयी प्रेम, अध्यापनातील कौशल्य, व्यवसायनिष्ठा, सामाजिक बांधिलकी व तदनुषंगिक अनुशासनयुक्त विविध उपक्रम ही शिक्षणाची पंचतत्त्वे आहेत. ती आपल्या सर्वांच्या प्रयत्नात दिसतात. शिक्षणाच्या नव्या वाटा यातूनच पुढे मिळणार आहेत.*

*भारतीय शिक्षण मंडळाच्या वतीने सर्वांना शुभेच्छा!*

*आपला स्नेहांकित,*
***वि. शि. खोचीकर***
*अध्यक्ष*
*भारतीय शिक्षण मंडळ, सांगली*

*With Best Complimnents From :*

**M/S. ELECTROMARK ASSOCIATES**

42 Electronic Estate
Pune - Satara Road,
Pune 411 009.

# स्वरुपाची जाणीव

*श्री. य शं. लेले यांस,*

*पदवी मिळविणे, जाड्या पगाराची नोकरी करून सर्व सुखसोयींनी युक्त असा टुमदार फ्लॅट घेणे — हे चांगले जीवन? आणि ते जगण्यासाठी पूर्वतयारी म्हणून रात्रंदिवस अभ्यास करण्यासाठी एकत्र येणे हे का संघटन? असे या संस्थेचे स्वरूप असे बाजारी नाही. 'स्व'रूपाची जाणीव करून देऊन त्याचा विकास करण्यासाठी झटणे हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून त्या दिशेने वाटचाल करणारी ही एक संस्था आहे.*

*'आजची बालके ही राष्ट्राचे उद्याचे आधार स्तंभ आहेत.' अशी अर्थपूर्ण विधाने पोकळपणे करणारे लोक समाजात भरपूर दिसू लागले आहेत. आणि या उद्याच्या आधारस्तंभांना लागणाऱ्या वाळवीकडे दुर्लक्ष करताना किंवा क्वचित मदत करतांनाही यातले काही दिसतात. या स्तंभांना वाळवी लागण्याचा जो काळ आणि ज्या जागा; त्याच नेमक्या काळात आणि त्याच जागांना वेळीच कुंपण घालून सभोवतालच्या सवंग गोष्टींपासून त्यांचे रक्षण करण्याचे काम स्व-रूप वर्धिनीने स्वीकारले आहे. आणि विशेष गोष्ट अशी की हे काम संघटना स्वत:च्या बाबतीत करते. 'कुणाचे तरी काहीतरी हटाव' मोहीम न काढता स्वत:चेच दोष घालवून, गुणसंवर्धन करण्याचे काम या संघटनेचे सभासद करतात.*

*वडिलधाऱ्यांविषयी आदर बाळगण्याची प्रवृत्ती पूर्ण नष्ट होते की काय अशी भीती वाटत असतानाच 'त्रिसूत्री' सारख्या उपक्रमातून रोज आई-वडिलांना नमस्कार करण्याचा संस्कार या संस्थेत होतो. चित्रपट, चित्रहार ..... यातून जिवाची करमणूक करून घेण्यापेक्षा पुष्कळ युवक-युवतींना रविवारच्या गप्पांचे आकर्षण या संस्थेच्या सभागृहात वाटू लागते.*

*जागोजाग अशा 'स्व'रूपवर्धिनी उभ्या राहू देत आणि त्यातूनच भारताचे नवे रूप वर्धमान होऊ दे.*

**राजेंद्रप्रसाद मसूरकर,**
*कोषाध्यक्ष, साने गुरुजी कथामाला*



*तरूणांना नुसता दोष देऊन भागत नाही तर त्यांच्या आकांक्षा सफल होतील अशी व्यवस्था करावी लागते.* **— डॉ. होमी भाभा**

## प्रेरणा

विवेकानंद शाखेतील आमचे एक पालक. एका रविवारी पूरक-आहारासाठी ऊसळ शिजवून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. ऐनवेळी घरातले रॉकेल संपले, तेव्हा त्यांनी घरातील कॉट मोडून त्या लाकडांच्या सहाय्याने चूल पेटविली व उशीर होऊ नये म्हणून घाईने शाखेवर पूरक-आहार पोहचविला.

ही गोष्ट नंतर त्यांच्या घरी गेल्यावर समजली. स्वत:ची आर्थिक अडचण असूनही इतरांना मदत करण्याचा हा सेवाभाव विरळाच नाही का!

## उद्याच्या आशा

'स्व-रूपवर्धिनी हे एक कुटुंब आहे.'

'इथले वातावरणच असे आहे की जो येतो तो आमच्यातलाच होऊन जातो.'

'गेली दहा वर्षे मी स्व-रूपवर्धिनीत येत आहे. इथे आल्यामुळे माझ्यात खूप चांगला बदल झाला आहे.'

'स्व' रूपवर्धिनीतील युवक मोठ्या उत्साहाने बोलत होते. मनात आले, 'आजचा युवक दिशाहीन झाला आहे. त्याला कशातच रस नाही, अशी सतत हाकाटी करणाऱ्यांना एकदा या युवकांचे दर्शन घडवायला हवे. आज गरज आहे ती युवकांच्या जीवनाला सुयोग्य अशी दिशा देणाऱ्या व्यक्तींची व संस्थांची.

आजचे समाजजीवन मोठे विचित्र झाले आहे. 'मी आणि माझे' या संकुचित आसाभोवती माणसे फिरत आहेत. एका कुटुंबात राहाणारी माणसेसुद्धा केवळ नाईलाज म्हणून एकत्र राहातात की काय अशी शंका अनेक वेळा घरा-घरातून डोकावून पाहिल्यावर येते. या पार्श्वभूमीवर निरनिराळ्या घरातून एकत्र आलेल्या युवकांना 'स्व'रूपवर्धिनी हे एक कुटुंबच वाटावे हा चमत्कारचे नव्हे काय?



विद्यार्थ्यांनी विद्या प्राप्त करावी व त्याचबरोबर त्यांनी आपल्या देशाचे, धर्माचे खरेखुरे सेवक बनावे यासाठी हे विश्वविद्यालय स्थापन करण्यात आले आहे.
— पं. मदनमोहन मालवीय

कोणतीही संस्था नीट चालायची असेल, वाढवायची असेल तर त्यासाठी गरज आहे ती तळमळीने व निस्वार्थीपणे काम करण्याऱ्या युवकांची! 'स्व'रूपवर्धिनीत सुरुवातीला अभ्यासाला व खेळायला म्हणून येणारी मुले आज युवक होऊन समर्थपणे संस्थेची धुरा सांभाळत आहेत. ही घटना केवढी विलक्षण आहे! चांगल्या कामासाठी पैसा उभा करणे ही गोष्ट अगदीच अशक्य कोटीतील नाही. पण अशी कामे करणारी माणसे तयार होणे यासाठी कठोर तपश्चर्याच हवी. 'स्व'रूपवर्धिनीच्या संस्थापक सदस्यांनी यासाठी अक्षरशः जीवाचे रान केले आहे. युवकांची भक्कम आघाडी उभारणारी ही संस्था या अर्थाने श्रीमंतच नव्हे काय?

पुस्तिकेच्या स्वरूपात विस्तृतपणे प्रसिद्ध होणारा संस्थेचा वार्षिक अहवाल वाचत असताना सतत वाटत राहते की या संस्थेकडे सांगण्यासारखे आणखी खूप काही आहे. पण या संस्थेचा खरा परिचय करून घ्यायचा असेल तर प्रत्यक्ष कामकाज पाहायला हवे. त्यात स्वतःही निःसंकोचपणे सहभागी व्हायला हवे. इथल्या युवकांशी मोकळेपणाने गप्पागोष्टी करायला हव्यात.

ज्या परिसरात 'स्व'रूपवर्धिनीचे कार्य चालू आहे. तिथे अजून बराच बदल घडवून आणायचा आहे. पुण्यात संस्थेचे कार्य वाढण्याच्या दृष्टीने आहे ही युवकांची फौज अपुरीच आहे.

हा जगन्नाथाचा रथ आहे. 'स्व'रूपवर्धिनीच्या डोळ्यांसमोर असणारे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांना गरज आहे ती या कामात योगदान करू इच्छिणाऱ्या उत्साही व सेवाभावी युवकांची ! आमचे युवक हे आव्हान स्वीकारतील का?

**डॉ. अनिल गोडबोले**
अध्यक्ष, साने गुरुजी कथामाला

*With Best Compliments from :*

**ADEPT LABORATORIES**

Karve Road, Pune 4.

# उंचावलेल्या अपेक्षा

*श्री. विलास चाफेकर 'जाणीव' व 'वंचित विकास' या संस्थांच्या द्वारे वर्धिनीसारखाच प्रयोग एका वेगळ्या पातळीवर करत आहेत. स्वरूपवर्धिनीच्या आजवरच्या वाटचालीत त्यांचा सहभाग मोठा आहे. वर्धिनीच्या युवकांकडून त्यांच्या अपेक्षा ते व्यक्त करत आहेत.*

एका कार्यक्रमाला गेलो होतो. एकदम समोर पाचसहा तरणीबांड मुलं आली. त्यांनी विचारलं, "सर, ओळखलं कां?" नावं लक्षात नव्हती. पण ओळखत होतो. गप्पा झाल्या, "काय करता" वगैरे चौकश्या झाल्या. मनात आलं, आपण खरंच या मुलांना ओळखतो का? ओळख पटू नये, इतका त्यांच्यात बदल झाला होता. आठ दहा वर्षांपूर्वी ती मुलं हडकुळी, दुर्लक्षित अशी दिसत होती. आता ती धिप्पाड दिसत होती. नीटनेटका पोषाख केलेली, उच्च शिक्षण घेतलेली! त्या जुन्या उपेक्षिततेच्या, संकोचलेपणाच्या खुणा राहिल्याच नव्हत्या.

प्रचण्ड घाणीच्या साथीनं उभ्या राहिलेल्या वस्त्या! अस्वच्छता, गरिबी, शैक्षणिक वातावरणाचा अभाव, व्यसनी माणसांची संगत असलेल्या त्या घरातली ही मुलं! आतां ती ओळखू येणार नाहीत अशीच वाटत होती. त्यांच्या घरांशी विसंगत. या घरातून ही मुलं मोठी झाली यावर विश्वासच बसू शकणार नाही.

हा कायापालट कोणी केला? स्वरूपवर्धिनीने अनेकांच्या ठायी असलेल्या निद्रिस्त 'स्व'ला जागं करून त्यांच्या खऱ्याखुऱ्या "माणसा"च्या रूपाचं वर्धन करण्याचा विडा उचललेल्या संस्थेनं!

शहरं वाढली तशा समस्या वाढल्या. या समस्या भेडसावू लागताच शासनासह अनेक संस्था संघटनांनी ते प्रश्न सोडवण्यासाठी काम करायला सुरुवात केली. प्रत्येकाने चालवलेले प्रयत्न महत्त्वाचे, पण सातत्य मात्र नाही.

या साऱ्या वातावरणात राहणारी पुढची पिढीच बदलावी म्हणजे त्यांच्या परिस्थितीतही सुधारणा होईल. म्हणून कसलीही अपेक्षा न ठेवता सतत काम करणाऱ्या 'स्वरूपवर्धिनी' चे वैशिष्ट्य जाणवते.

सेवानिवृत्तीनंतर "आता आम्ही थकलो, आम्ही काय करणार?" असं म्हणून देवदेव करत बसणाऱ्या किंवा क्लबमध्ये पत्ते व गप्पांचे अड्डे रंगवणाऱ्या माणसांना कृष्णराव पटवर्धन एक आदर्श वाटावेत. सामाजिक कामाची प्रेरणा असेल तर वय आडवं येत नाही. कोणत्याही वयात तारुण्यातील उमेदीनं काम करता येतं हे त्यांनी दाखवून दिलंय.



*ज्यावेळी माझ्यापुढे राष्ट्रहित का स्वसमाजहित असा प्रश्न उभा राहिल, त्यावेळी मी स्वसमाजहितापेक्षा राष्ट्रहिताला अधिक महत्त्व देऊन आमचे काहीही अहित झाले तरी ते आनंदाने पत्करीन.*

**— डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

त्यामुळेच महानगरपालिकेच्या शाळांच्या आवारात अपुऱ्या सोई व अनंत अडचणींना तोंड देत सुरू झालेलं स्वरूपवर्धिनीचं काम मंगळवार पेठेच्या परिसरातच उभ्या राहिलेल्या स्वतःच्या वास्तूत पोचलं आहे.

उपेक्षित वस्त्यांमधील हुषार मुलं निवडायची, त्यांना स्वरूपवर्धिनीच्या सायंकाळच्या वर्गात आणायचं, त्यांना विशेष शालेय मार्गदर्शन द्यायचं, त्यांच्या आरोग्य, आहार, सवयी याकडे लक्ष पुरवायचं, त्यांच्यावर चांगले संस्कार करायचे, त्यांच्यासाठी शिबिरं घ्यायची, सहली आयोजित करायच्या, त्यांना सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांची सुद्धा ओळख करून द्यायची आणि अशा पद्धतीने उपेक्षित वस्तीतल्या मुलांमधून संस्कारित तरुणांमध्ये रूपांतर करायचं असा हा स्वरूपवर्धिनीचा प्रयोग आहे.

गेली १०-१२ वर्षं सातत्याने हे काम चालू आहे. त्याची फळं तरण्याबांड सुशिक्षित मुलांच्या रूपानं आज दिसत आहे. स्वरूपवर्धिनीच्या स्वतःच्या वास्तूत आज अनेक कार्यक्रम चालत आहेत. मुलींसाठी संस्कार वर्ग, स्त्रियांसाठी उद्योग शिक्षण अशा अनेक गोष्टी चालू आहेत.



जोवर जगात यातना आणि अश्रु कायम आहेत; तोपर्यंत आपले काम सतत चालू राहिले पाहिजे.

– पं. जवाहरलाल नेहरू

अशा वेळी काही प्रश्न निर्माण होतात. ज्यांचा विचार करण्याची गरज आहे. सर्वच मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर आहे. अशा वेळी फक्त बुद्धिमान मुलं हेरून त्यांना शिक्षण दिल्याने काय साधेल? अन्य मुलांच्या रास्त प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी उचलायला हवी की नको? मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष किती काळ होऊ द्यायचे?

ज्या हुषार मुलांना शिक्षणाची संधी मिळाली ती नोकरी व्यवसाय सुरू झाल्यावरच समाजाच्या भल्यासाठी काम करतीलच असं नाही. मूठभर बुद्धिमान माणसं मिळालेल्या संधीचा उपयोग करून स्वतःच अस्तित्त्व भक्कम करण्याकडे लक्ष देतात. समाजाकडे वळत नाहीत. कोणत्याही समाजातील पहिले लाभार्थी स्वतःच्या लाभाचाच विचार करतात व "स्थिर" होण्याचा प्रयत्न करतात, असा अनुभव आहे आणि ते मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. त्यामुळे बुद्धिमान निवडक मुलांच्यापेक्षा सर्वसामान्यांच्या शिक्षणातून समाजाच्या हितासाठी काम करणारी मुलं मिळू शकली असती.

अपुऱ्या जागेत दाटीवाटीनं उभी राहिलेली घरे, बेकायदेशीर अस्तित्त्व, अपुरा पाणीपुरवठा, अस्वच्छता, रोजगाराची अशाश्वती, अनारोग्य, प्रचण्ड लोकसंख्या, व्यसने, बेकायदेशीर उद्योग, मुलांवर होणारा चित्रपट, दूरदर्शन इत्यादींचा अयोग्य परिणाम, गुन्हेगारी, या

*With Best Compliments from :*

**LAND MARK**

I. B. J. Road, Sadhu Waswani Chowk, Pune 411 001

सर्वांतून निर्माण होणारी संस्कृती या विराट प्रश्नाच्या सोडवणुकीकडे स्वरूपवर्धिनी वळणार का? बुद्धिमान निवडक मुलांच्या उत्तम शिक्षणातूनदेखील हा प्रश्न सुटणार नाही. तेव्हा समाजाच्या या महत्त्वपूर्ण व मूलभूत प्रश्नाकडे वळणे तर आवश्यक आहे.

हे प्रश्न स्वरूपवर्धिनीच्या नवीन पिढीसाठी आहेत. स्वरूपवर्धिनी हा एक उत्तम प्रयोग असला तरी तिने प्रयोगाच्या परिघातच गुंतून पडू नये, प्रश्नांच्या मुळाशी पोहचून परिवर्तनाच्या लढ्यात स्वरूपवर्धिनीने सामील व्हायला हवे.

त्या दिशेने तिची वाटचाल व्हायला हवी!

* *

## नेमके उत्तर

१३ जानेवारी, ९०

श्री. रा. रा. कृष्णराव पटवर्धन यांना,

स. न. वि. वि.

....स्वातंत्र्यापूर्वी या देशात अनेक समस्या होत्या. आजही आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून ४२ वर्षे झालीत पण त्यावर अजूनही उपाययोजना झालेली आढळून येत नाही. हे खरोखरी आपल्या देशाचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

...आपल्या देशातील सर्व समस्यांवर उपाय फक्त एकच आहे. तो म्हणजे सुसंस्कारक्षम, चारित्र्यसंपन्न असे जीवन जगणारा आदर्श नागरिक निर्माण होणे, आणि आपण नेमके हेच शोधून याच कार्यासंबंधी बालांमध्ये, तरूणांमध्ये सक्रीय प्रयत्न करून त्या मार्गावर योग्य वाटचाल करीत आहात. ह्या कार्यात परमेश्वर कृपेने आपल्याला यश ही येत आहे.

आपल्या या कार्यास शुभेच्छा व यश मिळण्या-संबंधी परमेश्वराजवळ प्रार्थना करून हे पत्र संपवतो.

आपला स्नेही,

**डॉ. भा. पु. देशपांडे**
देऊळगाव राजा,
बुलढाणा

* *

### प्रेरणा

मागील वर्षी (जुलै ८९) ईद आणि एकादशी एकाच दिवशी आली. वर्धिनीच्या वास्तूमध्ये श्री. आप्पाजी कुलकर्णी यांचे किर्तन चालू होते. त्याच वेळेला समोरच्या वस्तीत ईदच्या सणानिमित्त ध्वनीवर्धकावर गाणी लावली होती. त्याचा कार्यक्रमात अडथळा होत होता. आपल्या वर्धकांनी विनंती केल्यावर त्यांनी ध्वनीवर्धक बंद केला. परंतु किर्तनाचा कार्यक्रम थोडा जास्त वेळ



केवळ नोकरीसाठी एखादा विषय घेणे मला बरे वाटत नाही. मला ज्या अभ्यासात गोडी वाटते, आनंद वाटतो तो विषय मी घेईन.

**– डॉ. सी. व्ही. रामन**

चालला. शेवटी त्यांनी येऊन अदबीने विचारले की, 'आम्ही ध्वनीवर्धक सुरू करू का?' वर्धकांनी सांगितले की, 'कृपया ५/१० मि. वाट पहा नाही तर तुम्ही तुमचा कार्यक्रम सुरू करा.' आणि त्याप्रमाणे त्यांनी किर्तन संपल्यानंतर ध्वनीवर्धक सुरू केला.

## मिरवणुकीतील नाचाला नवी विधायक दिशा

*'स्व'रूप वर्धिनीच्या वाढत्या व्यापात युवकांचा सहभाग हा दिवसेंदिवस वाढतो आहे. दैनंदिन शाखेच्या छोट्या-छोट्या कार्यक्रमांपासून ते नैमित्तिक मोठ्या उत्सवांपर्यंत सर्व कार्यक्रमांची जबाबदारी समर्थपणे सांभाळीत आहेत. यापुढे याच युवा कार्यकर्त्यांच्या आधारावर हे कार्य अधिक खोलवर, अधिक दूरवर आणि अधिक दृढपणे उभे करण्याचा संस्थेचा मानस आहे.*

*सार्वजनिक उत्सवांमध्ये सहभागी होऊन त्याला अधिक चांगले, विधायक स्वरूप देण्याचा आपला प्रयत्न असतो व त्यासाठी चांगला पर्याय- चांगला कार्यक्रम देणे ही तर पहिली पायरी. पुण्यातील गणेशोत्सवामध्ये आपला सहभाग हा असाच उत्साहवर्धक आहे. त्याची ही एक पोच 'ज्ञानप्रबोधिनी' सारख्या सहविचारी संस्थेच्या युवक सचिवांकडून –*



*की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने, लब्धप्रकाशइतिहासनिसर्गमाने*
*जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे, बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे*

**– स्वातंत्र्यवीर सावरकर**

*माननीय मुख्याध्यापक,*
*'स्व'रूप वर्धिनी, पुणे.*

*सस्नेह नमस्कार*

*गणेश विसर्जन मिरवणूकीत आपल्या संस्थेचे समूह नृत्याचे (ध्वजदलाचे) पथक पाहिले. मन:पूर्वक आनंद झाला.*

*गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीस अधिक चांगले स्वरूप यावे यासाठी तरुणांनी नाचूच नये असा पर्याय ठेवण्यापेक्षा उत्साहपूर्ण, जोशपूर्ण व शिस्तबद्ध कसे नाचता येईल याचे नमुने लोकांसमोर ठेवावे लागतात. आपणही याच हेतूने विद्यार्थ्यांचे हे पथक तयार केले असेल असे वाटते.*

*आपल्या या प्रयत्नांस आमचे आवश्यकतेनुसार सहकार्य जरूर मिळत राहील. पुन:श्च सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!*

*कळावे,*

*आपला*

**विवेक कुलकर्णी**
*युवक सचिव*

*With Best Compliments from :*

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp. Octroi Naka,
Pune Satara Road, Pune 411 009. Tel : 431111

## मदतीचा हात

परगावी नातेवाईकांकडे, अगर सहलीच्या ठिकाणी सुद्धा वर्धकांची सहजतेने सर्वांच्यात मिसळण्याची, अडचणीच्या प्रसंगी मदत करण्याची वृत्ती असते. अखंडानंद शाखेचे वर्धक सिंहगडावर सहलीला गेले असताना, त्यांनी शारीरिकदृष्ट्या अक्षम, थकलेल्या गृहस्थांची . . . . . आपल्या छोट्या मुलासहित गड चढण्याची जिद्द पाहिली व त्यांना सर्वप्रकारे मदत केली. त्यांचे कृतज्ञतेने आलेले हे पत्र . . .

प्रिय संजय तांबट,
यांसी सा. न. वि. वि.

आम्ही मुंबईला सुखरूप येऊन पोहोचलो . . . . चि. जयदीप वैद्य व सागर सुराजी यांना स्वारगेटला सोडून आम्ही घरी गेलो. घरी सर्व काळजीच करत होते.

सिंहगड चढतांना तुमच्या मुलांनी आम्हाला जी मदत केली त्याचे आभार शब्दांनी मानणे अशक्य आहे. तुमच्याशिवाय आम्ही सिंहगड सुरक्षितपणे चढूच शकलो नसतो. येथे आल्यावर दुसरे दिवशी आमच्या खाली भरणाऱ्या शाखेत मी मुद्दाम गेलो व या प्रसंगांचे वर्णन केले.

तुमची 'स्व-रूप वर्धिनी' संस्था जे अनेक उपक्रम आयोजित करते त्याला माझ्या हार्दिक शुभेच्छा! सोबत ५१ रु. चा ड्राफ्ट पाठवत आहे. कृपया तो स्वीकारावा.

आपला स्नेही
**ल. गो. कुलकर्णी**

### प्रेरणा

दहावीच्या शालांत परिक्षेत ८०, ९०% गुण मिळवणारे शेकडो असतात. परंतु आपल्या हुशारीचा इतरांनासुद्धा फायदा मिळावा यासाठी सातत्याने झटणारे थोडेच! दहावीत ८९% गुण मिळविणाऱ्या आमच्या एका युवा-वर्धकाने आपल्या अंध मित्राला रोज काही तास शिकवून त्यालाही १० वीत ७२% गुण मिळवण्यास मदत केली व पुढील शिक्षणासाठी उत्साह वाढविला. हा बहाद्दर सुद्धा स्वतःच्या हिमतीवर बी. ए. झाला व एम्. ए. साठी प्रवेश सुद्धा मिळवला.

परंतु एवढेच नव्हे तर या युवकाने बहिणीच्या लग्नात स्वतः नवीन कपडे न शिवता आपल्या अंध मित्रासाठी नवीन कपडे शिवले. हा आपुलकीचा स्पर्श हा तर इथला सहजभावच नाही का!



राष्ट्रीय भावना शिथिल झाल्याने, व्यक्ती व समष्टी यांचे संबंध विसकटले. व अशा असंघटित अवस्थेमुळे दिग्विजयाच्या नौबती झडविणारा समाज शेकडो वर्षे परक्यांच्या पाशवी सत्तेखाली चिरडला गेला. हा पराभव धुवून काढण्यासाठी समाजाच्या नसानसात राष्ट्रीयतेची भावना खेळविण्याची व त्या भावनेने सारा समाज अनुशासित व संजीवन करून त्याला दिग्विजयी स्वरूपात उभे करण्याची गरज आहे.


**– संघसंस्थापक परमपूजनीय डॉ. हेडगेवार**

## नाहीतर मी पाणी सुद्धा पिणार नाही

जितेंद्रला नमस्कार,
व तुझ्या आईवडिलांना नमस्कार,

पत्र लिहिण्यास कारण की तू मला सांगितलेस की, मी तुझ्याबरोबर मुंबई पाहण्यास येईन. मला खूप आनंद झाला. पण तू संजय व दीपक एकाएकी नाहीसे झालेले पाहून मला खूप दु:ख झाले. मी खूप रडलो! मुले म्हणू लागली, "का रे ते तुझे नातेवाईक आहेत का?" मी मोठ्या अभिमानाने सांगितले की ते माझे भाऊ आहेत. रडण्याच्या भरात माझे लक्ष मुंबई पाहाण्यात नव्हते तर तुमच्याकडेच होते. माझे जे चौदा रुपये आहेत ते तुम्ही तुमच्या शाखेला मदत म्हणून घ्या व तुम्ही नाताळच्या सुट्टीत माझ्या घरी या. तुम्ही आला नाहीत तर मी पाणी सुद्धा पिणार नाही.

तुझा,
**आकाश**



मातृभूमीच्या चरणी आपले सर्वस्व - आपल्याला सर्वात प्रिय असलेल्या गोष्टीही - अर्पण करणे हे या भूमीच्या प्रत्येक सुपुत्राचे प्रथम आणि सर्वोपरी कर्तव्य आहे.

**– प. पू. श्री. गुरुजी**

## संस्कारांची शिदोरी

बाहेरगावी शिक्षणासाठी किंवा व्यवसायासाठी जाणारा आपला वर्धक हा बरोबर वर्धिनीत झालेल्या संस्कारांचे तहान लाडू - भूक लाडू घेऊन जातो. त्याचे प्रत्यंतर वर्धिनीचे काम वेगळ्या स्वरूपात उभे करण्याच्या प्रयत्नांत तर येतेच, शिवाय व्यवसायामध्ये सुद्धा तो स्वत:चा असा चांगला ठसा त्या ठिकाणी उमटवतो. जम्मू काश्मिर येथे सैनिकी सेवेसाठी रूजू झालेला एक विद्यार्थी लिहितोय —

१० मे, १९९०

प्रिय सर,
सादर नमस्कार,

मला 'स्व'रूप वर्धिनी सोडून किमान ६ वर्षे झाली असावीत. परंतु अधूनमधून आमच्या घराशेजारी आपली गाठभेट होत होती. मी गेले काही वर्षे संस्थेत येऊ शकलो नाही याचा अर्थ असा नाही की, मी जे आपल्या संस्थेत लहानपणी विद्यार्थीजीवनात ज्ञानाचे, संस्कारांचे धडे आत्मसात केले, त्याचा विसर पडला, तर याचा माझ्या जीवनावर खूपच प्रभाव पडला.

आता मी एक देशसेवक या नात्याने Military Engineering Services मध्ये आर्मीद्वारा निवडलो गेलो असून, सध्या ट्रेनिंग संपवून जम्मू काश्मिर येथे पोस्टिंग झाले आहे. मी मिलिटरी किंवा देशासाठी काहीतरी काम करीत आहे याचा मला अभिमान वाटतो. 'स्व'रूपवर्धिनीत मी जगात कसे जगावे, कोणत्या गोष्टींना किती महत्त्व द्यावे या गोष्टी शिकलो. याचा मला सध्या जीवनात उपयोग होतो आहे आणि पुढेही होणार आहे याचा मला आत्मविश्वास आहे.

कळावे,

आपला विद्यार्थी,
**सुरेश लाड**

*With Best Compliments from :*

**M/s. Brite Electroplates**

Tophkhana Shivajinagar, Pune 411 005.

## प्रेरणाजागृती हीच परिवर्तनाची शक्ती

वर्धिनीच्या वाढत्या व्यापाबरोबर युवतींची निवेदिता शाखा व महिला विभागाचा वेलू सुद्धा गगनावरी झेपावत आहे. 'मुंगी उडाली आकाशी, तिने गिळले सूर्याशी. . . .' याच एका प्रचंड उर्मीने युवती कार्यकर्त्या हा चैतन्याचा रथ समर्थपणे ओढीत आहेत. या कार्यामागची भूमिका संघाच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या पत्रव्यवहारातून सुंदरपणे व्यक्त झाली आहे.

सुश्री. पुष्पा

सस्नेह शुभाशीर्वाद

तुझे तारीख नसलले विस्तृत पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. 'स्व'रूप वर्धिनीच्या कामात तू पूर्णपणे रमलेली आहेस हे पाहून मनाला बरं वाटलं. कोणत्याही कामात पूर्णत: गुंतून गेल्याचा आनंद वेगळाच असतो. ईश्वर तुला तुझ्या कामात सुयश आणि आनंद देवो हीच प्रार्थना!

स्वत:ला तू समाजसेवेच्या कामात वाहून घेतलंयस ही आनंदाची गोष्ट आहे. दोन वर्षापूर्वी म्हैसूरला 'हिंदुसेवा प्रतिष्ठान' च्या वतीने समाजसेविकांचा एक चाळीस दिवसांचा वर्ग झाला होता. त्यात स्वामी रंगनाथानंद आले होते. वर्गात भाग घेणाऱ्या १४० मुलींसमोर बोलताना ते म्हणाले होते, "स्वामी विवेकानंदांनी जेव्हा भारतीय स्त्रियांमध्ये काम करण्यासाठी महिलांना आवाहन केले होते, तेव्हा त्यांना एकही महिला मिळाली नाही. म्हणून त्यांना इंग्लंडहून भगिनी निवेदिताला आणावं लागलं.

किंतु आज मी माझ्यासमोर इतक्या तरूण, सुशिक्षित मुली समाजसेवेसाठी बाहेर पडताना पहात आहे! म्हणजे भारताचे भविष्य उज्ज्वल आहे, यात प्रत्यवाय नाही." समाज सेवेसाठी तू स्वत:ला वाहून घेतलंस हे वाचून मला त्या शब्दांची आठवण झाली.

आपल्या पत्रात तू स्वत:बद्दल अभागी, अबला आदि शब्दांचा प्रयोग केला आहेस. हे करणे उचित नाही. भगवंतांनी आम्हाला काहीतरी चांगल्या कामासाठी या जगामध्ये पाठवलेलं असतं, म्हणून मनामध्ये हीन भावना आणू नये. समर्थांचे वचन या दृष्टीने अत्यंत प्रेरणास्पद आहे.

'समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ।।

. . . भावनांच्या भरारीत तू अनेक ठिकाणी तरतम भावाचा उपयोग केला आहेस. खरे पाहिले तर इतके भावूक होण्याची काही गरज नाही. आम्ही सगळी सामान्य माणसं. उदात्त ध्येयासाठी स्वत:ची योग्यता वाढविणे अपरिहार्य आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटलं आहे –


" महत्कार्याचे कंकण धरिले
आता महत्तमत्व पाहिजे बाणले . . "

म्हणून ध्येयाची सतत कास धरून त्यासाठी 'माझे सर्वस्व पणाला लावीन' या बुद्धीने कामाला लागले, म्हणजे आवश्यक योग्यता आपोआप उत्पन्न होते. त्या उदात्त ध्येयाचे सतत चिंतन चालो हीच परमेश्वराकडे विनंती.

'स्व-रूप वर्धिनीचे काम अतिशय चांगले व प्रेरणास्पद आहे. सेवेसाठी कामाची उणीव नाही. उणीव आहे फक्त करणारांची. ही उणीव जर आम्ही भरू शकलो तर या देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल यात तिळमात्र शंका नाही.

घरच्या मंडळींना यथायोग्य अभिवादन.

तुझा भाऊ सुदर्शन



लोक हो, एकदा डोके वर करून उभे तर रहा! तुम्हाला असं दिसेल की, ज्यांना तुम्ही घाबरत आहात ते तुमच्यापेक्षाही जास्त भित्रे आहेत.

– रवींद्रनाथ टागोर

## 'भगिनी निवेदिता शाखा'

१ जून १९८८ रोजी 'स्व'रूप वर्धिनीच्या मुलींसाठी 'भगिनी निवेदिता शाखा' सुरू झाली. शाखेचं कार्य हे सुसंस्कारित मने घडविण्याचं असल्याने त्या दृष्टीने अडीच वर्षे हा कालावधी खूपच लहान आहे. एवढ्या छोट्या कालावधीत, त्यांची रसरशीत फळे दिसणारही नाहीत, परंतु कुठेतरी अंकुर फुटला आहे हे जाणवते.

मुलींची शाखा ही रोज सायंकाळी ६.१५ ते ८.३० या वेळात चालते. रोज एक तास खेळ, प्रार्थना व नंतर तासभर शालेय अभ्यास आणि अवांतर वाचन, हस्ताक्षर सुधारणा वगैरे केले जाते. याशिवाय सुट्टीमध्ये शिबिरे, सहली, उत्सवानिमित्त काही कार्यक्रम इत्यादींचे आयोजन केले जाते. तसेच मानसिक विकास बैठक, सामाजिक



थोर स्त्रियांच्या दृष्टीने इतर कोणत्याही देशापेक्षा भारत हा अधिक महान् देश आहे असे मला वाटते. भारताने स्त्रियांचे सामर्थ्य जोपासले आहे; जाणले आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या पवित्र स्मृतीची जपणूक नेहेमीच मोठ्या कसोशीने केली आहे.

—भगिनी निवेदिता

संस्थांना भेटी, विविध व्याख्याने, याद्वारा आपल्या समाजाचे प्रश्न दैन्यावस्था इ. विषयी जाणीव जागृत करण्याचे प्रयत्न केले जातात..

निवेदिता शाखेवर कार्यकर्त्यांची कमी असल्यामुळे बऱ्याच व्यवस्था ८ वी ते १० वी या गटातील मुली सांभाळतात. मैदान व्यवस्था, पूरक आहार व्यवस्था, वाढदिवस व्यवस्था व इतरही छोटी कामे, त्या जबाबदारीने पार पाडतात. यंदाच्या वर्षी गणेश-विसर्जन मिरवणुकीत मुलींचे लेझीम पथक एका नववीतील विद्यार्थिनीने बसवले व त्याचे नेतृत्व केले.

येणाऱ्या छोट्या-छोट्या अनुभवांवरून कार्याची दिशा बरोबर आहे हे जाणवते. अजूनही युवती कार्यकर्त्यांच्या कमी संख्येमुळे जेवढे कार्य व्हायला हवे तेवढे झालेले नाही. सुदैवाने हळूहळू युवतींची संख्या वाढते आहे. यातूनच हे कार्य फोफावेल.

एका दिवाळीच्या सुट्टीत दोन मुलींनी पणत्या करून विकल्या व त्यात मिळालेला नफा वर्धिनीला दिला.

मुलींची सहल पर्वतीवर गेली असता तेथील झोपड्यांमधील दारिद्र्य पाहून मुलींना वाईट वाटले. त्यावेळी काही मुली म्हणाल्या, 'किती गरिबी आहे इथे! आपण दिवाळी फराळ वाटपाला येथे यायला हवं!"

एकदा रिमांडहोममध्ये रक्षाबंधनासाठी गेलेले असतांना मुलींना कळले की, मुलींसाठीही रिमांड होम आहे. त्यावेळी एका मुलीने झटकन् विचारले, "मग त्या मुली कोणाला ग राख्या बांधत असतील?"

*With Best Compliments from :*

**METAFIN PROCESSOR**

106/A, Shivajinagar, Tophkhana Shivajinagar, Pune 411 005.

## शारदामणी महिला विभाग

'स्व'रूप वर्धिनीच्या वास्तूमध्ये दुपारी महिलांसाठी शिवणवर्ग, गृहशुश्रूषा वर्ग (Home Nursing Course), भजनी मंडळ वगैरे विविध उपक्रम शारदामणी महिला विभाग चालविते. त्यातील काही महिलांच्या प्रतिक्रिया–

**१) सौ. सुलोचना शिंदे – शिवण वर्ग**

शिवण वर्ग व त्याच्या जोडीला अनेकविध कार्ययोजना यांचा प्रत्येकाला फायदा होतो. प्रत्येकाच्या कलेला व गुणाला येथे चांगला वाव मिळतो. विविध विषयांवर स्वरूपवर्धिनी आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन तर्फे दिलेल्या माहितीच्या आधारे, मी 'तरुण स्त्रिया - भूमिका व जबाबदारी' आणि 'पालक व त्यांची जबाबादारी' या विषयावर लेख लिहिले. अगोदर घरातच असल्यामुळे असा विचार करावयास वावच मिळाला नाही. पण हे सर्व मला वर्धिनीच्या शिवणवर्गाला आल्यामुळे साध्य झाले. 'स्व'रूप वर्धिनीसाठी आपणसुद्धा काहीतरी करावे असे अंत:करणातून वाटते.

**२) श्रीमती अंजली शिवप्रसाद मोदी**

मला या ठिकाणी शिवणवर्गाबिरोबर अनेक गोष्टी शिकण्यास मिळाल्या. गृहशुश्रूषा, भरतकाम/विणकाम व बाहुल्या तसेच इतर खेळणी बनवण्याचाही या ठिकाणी वर्ग घेतला जातो. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा अनेक गोष्टींवर व्याख्याने दिली जातात. तसेच 'ग्रामायण' सारख्या काही फिल्मस् दाखविल्या जातात. या सर्वांचा उद्देश सर्वांगीण विकास हाच आहे. वेगवेगळ्या प्रकारचे पौष्टिक पदार्थ बनविण्याचेही शिकविले जाते.

आम्हाला एकदा वर्गात कुटुंबनियोजनासाठी सर्वेक्षण करण्यासाठी सांगितले मला तर सुरुवातीला असे वाटले 'नको हे काम! उगीच खटाटोप करायचा व लोकांची बोलणी ऐकायची ---- ' पण अशी समजूत चुकीची होती. समाज जर सुधारायचा असेल तर हे सर्व सहन केलेच पाहिजे. त्यासाठी लागणारे कष्ट केलेच पाहिजेत. प्रत्येकाने आराम करायचे ठरविले तर हे काम कोण करणार? आपल्या समाजाची, देशाची प्रगती कशी होणार? हे सर्वेक्षण केल्यावर मला वाटले की आपण सुद्धा समाजासाठी, काही तरी काम केले. लहान का होईना पण आपण मदत तर केली!

**३) नीना गोखले**

मला शिवणाची नुसती आवडच लागली नाही तर रोज काही नवीन शिकावे असे वाटू लागले. मी घरच्या घरीच कपडे शिवू लागले. कपडे घरीच शिवल्यामुळे पैशांची बचत कशी होते ते समजले व वाचलेल्या पैशांतून आपण आपल्याला लागणाऱ्या वस्तू आणू शकतो किंवा ते बँकेत भरू शकतो.

शिवणाच्या वर्गाबरोबरच मेंदीचा वर्ग पण झाला. मी आधीच मेंदीचा वर्ग केलेला असल्यामुळे इतर मुलींना शिकवले तेव्हा खरंच माझ्या मनात आले की आपल्याजवळ जे काही आहे ते दुसऱ्याला देताना काय आनंद होतो!



*आपण जबाबदार मानवी व्यक्ती आहो ही भावना आपल्या सामर्थ्याविषयी आत्मविश्वास ज्यायोगे उत्पन्न होईल, असे शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे.*

**– महर्षी धों. के. कर्वे**

स्वरूप वर्धिनीने कधीच भेदभाव केला नाही व सर्वांना समान वागणूक दिली. मला इतरांना सांगतांना 'स्व'रूपवर्धिनीतच वर्गाला जा असे अभिमानाने सांगता येते.

## उर्दू भाषिक मुलींसाठी मराठी शिक्षणाचा वर्ग

महिलांसाठी व्यावसायिक शिक्षण देणारे वर्ग, प्रौढ शिक्षण वर्ग इत्यादी चालू असताना असे लक्षात आलं की काही उर्दू भाषिक महिला, मुली- केवळ मराठी येत नसल्यामुळे येऊ शकत नाहीत. तेव्हा त्यांची अडचण जाणून त्यांच्यासाठी 'मराठीचा वर्ग चालू झाला. त्यांना आता बऱ्यापैकी मराठी येते व शिवणवर्गाचा व इतर गोष्टींचा त्यांना लाभ घेता येतो.

आता या मुलींची संख्या ३० पर्यंत आहे.

वर्धिनीच्या अन्य कार्यक्रमांमध्ये देखील त्यांचा सहभाग असतो. एका कार्यक्रमात या मुलींनी उत्स्फूर्तपणे कृष्ण-गोपी नृत्य बसविले होते.



नुसते लिहिण्या-वाचण्यास येण्याने राष्ट्रीय शिक्षण होत नाही. देश ओळखण्यास शिकणे याला राष्ट्रीय शिक्षण म्हणतात.

**— लोकमान्य टिळक**

## आजोळ

आपुलकी, जवळीक आणि लळा या तीन शब्दांची सांगड म्हणजे आजोळ!

ज्या मुलांचे पालक अर्थार्जनासाठी दिवसभर घराबाहेर असतात व ज्या मुलांची शाळा सकाळची असते ती मुले दुपारी घरीच असतात. त्यांच्यावर कोणाचेही लक्ष नसते व कोणतेही बंधन नसते. त्या मुलांचा हा वेळ वाया जातोच शिवाय वाईट संगतही लागते. कित्येक पालकांना इच्छा असूनही याकडे लक्ष पुरविता येत नाही. यासाठीच जुलै १९८८ मध्ये आजोळ सुरू झाले. इयत्ता ५वी ते ७ वी मधील पाच मुलांना घेऊन प्रकल्पाला सुरुवात झाली. दुपारी १ ते ५ या वेळामध्ये ही मुले वर्धिनीत असतात.

या मुलांना शालेय अभ्यासाव्यतिरिक्त योगासने खेळ, गाणी - इंग्रजीतून बोलणे, तसेच छोट्या-छोट्या बोधप्रद गोष्टींतून समाजात कसे वावरावे हेही नकळत शिकविण्यात येते. आजोळची मुलांना इतकी ओढ लागते की ८ वीत गेल्यानंतर दुपारची शाळा असल्याने त्यांना 'आजोळ' सोडावे लागते. काही मुलांनी जाताना सकाळी आजोळ सुरू करावे अशी इच्छा व्यक्त केली. त्यानंतरही मुले आठवड्यातून एकदा तरी येऊन भेटून जातात.

आजोळची सर्व जबाबदारी श्री. नाना जोशी, पुष्पाताई नडे, निलुताई गायकवाड, सौ. बागेश्री पोंक्षे यांनी सांभाळली आहे.

*With Best Compliments from :* **INTERNATIONAL TRADE SYNDICATE**

Dealers in : Dyes, Chemicals & Sizing Materails
Raw Material For plant Industries
(Glue Flakes Technical Gelatines synthetic reasins pigments etc.)
93/ 95. Perin Nariman, Bazargate Street, 2nd Floor, Fort, Bombay 400 001

## महत्त्वाच्या घडामोडी

१) १ ते ५ नोव्हेंबर ८९ या कालावधीत मुलामुलींचे एकत्रित असे हिवाळी शिबिर यशस्वीरीत्या झाले. शिबिराचे ठिकाण होते - मॉडर्न हायस्कूल, तर शिबिराचा विषय होता - क्रांतिकारकांचा प्रेरणादायी इतिहास.

या शिबिराच्या योगाने मुलांना शाळेत क्वचितच शिकवला गेलेला असा इतिहास समजला व गोष्टीरूपाने विषयांची मांडणी असल्याने इतिहासाची आवड निर्माण झाली. श्रीकांत यादव या युवावर्धकाने शिबिर प्रमुखाची जबाबदारी सांभाळली.

२) २ मे ते ९ मे १९९० या कालावधीत दोन स्वतंत्र शिबिरे घेण्यात आली.

मुलांचे शिबिर शिवापूर येथील 'शिवभूमी विद्यालय' येथे झाले. 'देशापुढील समस्यांचे आव्हान' असा शिबिराचा विषय होता. युवक कार्यकर्त्यांची अभ्यासपूर्ण व्याख्याने, पुस्तकवाचन, गटचर्चा यात सर्व वयोगटाच्या मुलांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. शिबिर प्रमुख होते - एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. सुनील कुलकर्णी. पाण्याची अत्यंत अडचण असूनही वर्धकांनी त्यावर एकत्रितरीत्या यशस्वी मात केली.

याच कालावधीत निवेदिता शाखेच्या मुलींचे शिबिर श्री. ना. दा. ठाकरसी महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये पार पडले. स्वतंत्रपणे शिबिर आयोजित करण्याचा त्यांचा हा पहिलाच अनुभव. शिबिराचा विषय होता 'धडपडणारी माणसे.'

३) वार्षिक नियोजन बैठक व युवकशिबिर यंदा 'बाल ग्राम' येरवडा येथे संपन्न झाले. ३० जून ते ४ जुलै, या कालावधीत अन्य कार्यक्रमांबरोबरच वर्धिनीचे काम अधिक नियोजनबद्ध कसे करता येईल व पुढील १० वर्षांत कोणता टप्पा गाठवयाचा याचा विचार झाला.

उद्‌गीरचे श्री. होळीकर सर हे या बैठकीस उपस्थित होते. या बैठकीचे फलित म्हणून आपला एक युवक विलास कुलकर्णी याच्या मदतीने संभाजीनगर (औरंगाबाद) येथे 'स्व'-रूप वर्धिनीचे काम सुरू झाले.

४) **सहली**

या शैक्षणिक वर्षात २७ युवकांचे 'वासोटा' येथे गिरिभ्रमण तसेच विवेकानंद व अखंडानंद शाखेच्या सिंहगड सहली, रामकृष्ण शाखेची



संपूर्ण क्रांती ही सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, तात्विक, बौद्धिक, शैक्षणिक आणि अध्यात्मिक अशा सप्तविध क्रांतीचा एक समन्वय असेल.

— जयप्रकाश नारायण

'राजमाची' सहल अशा सहली घेण्यात आल्या. निवेदिता शाखेची २३ मुलींची सहल 'रामदरा' येथे गेली तर महिला विभाग 'उरळीकांचन'ला भेट देऊन आला.

५) साप्ताहिक बैठक

## असे वक्ते अशी व्याख्याने

| | | |
|---|---|---|
| श्री. मुकुंदराव गोरे | — | आर्थिक स्वातंत्र्याचा लढा व आं. का. सं. जिनिव्हा परिषदेची माहिति |
| डॉ. अरविंद लेले | — | निवडणूक ८९ व सद्यस्थिती |
| श्री. संजय सराफ | — | 'बीड' जिल्ह्यातील ग्रामविकासाचे कार्य |
| श्री. वसंतराव दाते | — | काश्मिरची चिंताजनक परिस्थिती - आँखो देखा हाल. |
| श्री. ब. ना. जोग | — | मुस्लिम मानसिकता |
| श्री. केशवराव केळकर | — | वनवासी कल्याण आश्रम कार्य व भूमिका |
| श्री. कुमार भावे | — | निर्णय'शक्तीचे महत्त्व |
| श्री. भीमराव गस्ती | — | बेळगाव' येथे बेरड समाजासाठी चाललेले कार्य |
| श्री. सुहास हिरेमठ | — | संघटनेची पथ्ये |
| डॉ. वाणी | — | रक्तदान- एक सामाजिक गरज व जनकल्याण रक्तपेढी |
| प्रा. सौ. चंद्राताई दलाया | — | 'अंदाजपत्रक' कसे सादर करतात? |
| श्री. नवलमलजी फिरोदिया | — | 'सचोटी, हातोटी व चिकाटी' |
| डॉ. अशोक कुकडे | — | विवेकानंद रूग्णालय (लातूर) कार्याचे स्वरूप व प्रेरणा. |
| श्री. शरद कुंटे | — | फाळणीचा इतिहास |
| कु. सुनीता खेर | — | काश्मिरची स्थिती व विस्थापितांचे वेदनादायी अनुभव |



*विद्यार्थीदशेपासूनच जर राष्ट्रकारणाचा विचार केला नाही तर राष्ट्राला विचारवंत कार्यकर्ते व पुढारी मिळणार कोठून ?*

**— नेताजी सुभाषचंद्र बोस**

### प्रेरणा

एका उपेक्षित वस्तीमध्ये राहणारा आमचा एक वर्धक. वडिलांच्या व्यसनामुळे कुटुंबाची सर्वच जबाबदारी त्याच्यावर होती. कित्येक वेळा स्वयंपाक करण्यापासून ते बहिणीचे लग्न जमवणे; त्यासाठी खर्चाची व्यवस्था करण्यापर्यंत सर्व कामे त्यालाच करावी लागत. अशा अवस्थेत महाविद्यालयीन शिक्षणही सांभाळायचे.

महाविद्यालयीन एका निबंध स्पर्धेत त्याला पहिले बक्षिस मिळाले. विषय होता- भारताच्या स्वातंत्र्याची चाळीस वर्षे. घरची अत्यंत अडचण असतानाही मिळालेली बक्षिसाची रक्कम त्याने वर्धिनीला देणगी म्हणून दिली.

हार्दिक शुभेच्छा!

**मे. रमणलाल ट्रेडिंग कंपनी**

२३ भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे ४११ ००२.

नारळ, मिरची व किराणा मालाचे दलाल

फोन : रेसि : २०९६८

ऑफिस : दुकान : २१४७६

६) *मान्यवरांच्या भेटी –*

*या वर्षात सांगलीचे श्री. खोचीकर, श्री. होळीकर (उद्गीर), कु. सुनीता खेर, संयुक्त राष्ट्रांच्या ग्रंथालयातील श्री. गरदे, रा. स्व. संघाचे प्रांतसेवा प्रमुख श्री. भैय्याजी जोशी, डॉ. कृष्णाताई निमकर, डॉ. भीमराव गस्ती, श्री. नवलमलजी फिरोदिया, डॉ. माधवराव परांजपे, मा. श्री. भाऊराव देवरस इत्यादी मान्यवरांनी संस्थेला भेटी दिल्या.*

७) *विशेष-*

*४ मार्च १९९० ला संस्थेच्या हितचिंतकांचा 'सुहृद मेळावा' संपन्न झाला. यासमारंभास ३०० मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचे एक चित्र- प्रदर्शनही त्यात सादर केले गेले.*

❖ *वर्धिनीतील एक शिक्षक कार्यकर्ता कु. प्रमोद चिवटे हा तंत्रशास्त्रातील उच्चशिक्षणासाठी अमेरिकेस रवाना झाला. त्याचा एक भावपूर्ण निरोपसमारंभ ७ ऑगस्ट १९८९ ला संपन्न झाला.*

❖ *मंदार शहाणे या युवावर्धकाने परिसरातील काही व्यसनी लोकांसाठी व्यवसनमुक्तीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यात त्यास यशही मिळत आहे. सध्या त्याच्या संपर्कात ११ व्यक्ती आहेत.*

❖ *परिसरातील महिलांसाठी १८ सप्टेंबर ८९ ला पहिला 'गृहशुश्रूषा वर्ग' (Home Nursing Course) सुरू झाला. वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन आणखी काही 'वर्गां'ची योजना केली आहे.*

❖ *'लायन्स क्लब'च्या सहकार्याने वर्षभरामध्ये सुमारे ४०० मुलांची आरोग्य तपासणी झाली. तर रोट्रॅक्ट तर्फे आयोजित एका आरोग्य शिबिरात सुमारे ५० बालकांना मोफत औषधे व लसटोचणी करण्यात आली.*

*यंदा एप्रिल ९० मध्ये आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात १०० बाटल्या रक्त जमा झाले. रक्ताची तीव्र गरज लक्षात घेऊन जनकल्याण रक्तपेढीने केलेल्या विनंतीनुसार केवळ एक दिवसाची सूचना मिळूनही शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला.*

❖ *बालवयापासून वर्धिनीत असलेला व यंदा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेला कु. सुनील भरतिया याने वर्धिनीचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून वर्षभर जबाबदारी स्वीकारली. वर्धिनीतच घडलेला हा वर्धिनीचा पहिलाच पूर्णवेळ कार्यकर्ता.*

❖ *कु. दीपक धामापूरकर हा यंत्र अभियांत्रिकी पदविकेच्या (D.M.E.) परीक्षेत ८०% गुण मिळवून सर्वप्रथम आला.*



*हेतुत: उभारलेले अभियोग किंवा महत्तम ध्येयाचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांचे बंदीवासही क्रांतीची प्रगती रोखू शकणार नाहीत. दिव्य ध्येयासाठी होणारा कोणताही त्याग लहानच ठरेल.*


**– सरदार भगतसिंह**

## असाही सहभाग हवा .....

आतापर्यंत आपण कार्यवृत्त वाचले आहे. त्यावरून आजच्या समाजस्थितीत ह्या कामाचे मोल आपल्या लक्षात आले असेल. कामाच्या वाढीसाठी आपलाही एक हात असणे जरूरीचे आहे.

या कामात निधिरूपाने अनेकांनी सहकार्य केले आहे. त्याची आवश्कता नक्कीच आहे .... पण त्याहीपेक्षा अधिक मोलाचा 'वेळ' देणारी माणसे हवी आहेत. सेवावृत्तीने वेळ देणारी माणसे मिळाली तर कार्याची गती वाढू शकेल. आमच्या नैमित्तिक उत्सवांमध्ये, साप्ताहिक कार्यक्रमांमध्ये, तसेच दैनंदिन खेळ-तासिका यामध्येसुद्धा आपला सहभाग असू शकतो. आपल्या अनुभवांची शिदोरी आपण मुलांसमोर उघडू शकाल!

वेळ देणारी माणसे नवनवीन कल्पनाही घेऊन येतात. त्या सर्वांना वास्तवतेच्या चौकटीमध्ये बसवून एका स्वस्थ, सुंदर समाजाची निर्मिती होऊ शकेल. या सर्वांसाठी आपल्या सहभागाची नितांत आवश्यकता आहे आणि अर्थात् अपेक्षाही ....



सामुदायिक साधनतेत व्यक्तिगत साधनेचा कस पडताळून पाहता येतो आणि मनाचे कानेकोपरे झिजण्यास मदत होते.

— विनोबा भावे

## आवाहन ..... आर्थिक मदतीचे

आपणास हे माहितीच आहे की, कोणत्याही प्रकारच्या सरकारी अनुदानाशिवाय कुठल्याही प्रकारचे कर्ज न काढता वर्धिनीची वाटचाल सुरू आहे. मुलांचे शिक्षण, सहली, शिबिरे .... व्यायामशाळा, बालवाडी, आजोळ, अभ्यासिका, ग्रंथालय, प्रयोगशाळा इ. अनेक उपक्रम करत असताना आर्थिक आघाडीचा तोलही सांभाळावा लागतो. गेल्या शैक्षणिक वर्षात सुमारे दोन लाख रुपये यासाठी खर्च झाले आहेत. आपल्यासारख्या सुहृदांच्या सहाय्यानेच हे शक्य होत आहे. हे काम अधिक गतीने करावे असा मानस आहे. अर्थातच् त्यासाठी अधिक द्रव्यसहाय्याचीही आवश्यकता आहे. ज्या प्रमाणात हा भार आपण कमी करू शकाल, जितके अधिक सहाय्य देऊ शकाल तेवढे अधिक लक्ष आम्हाला उद्याच्या राष्ट्रीय संपत्तीकडे, गुणी विद्यार्थ्यांकडे देता येईल.

सध्याची वास्तू कामाचा पसारा लक्षात घेता अपुरी पडू लागली आहे. म्हणून आपल्याला अधिक दोन मजले बांधावयास लागणार आहेत. त्यासाठी म.न.पा.ने परवानगीही दिली आहे. त्यासाठी शक्य त्या प्रमाणात अधिकात अधिक सहाय्य आपण करावे, ही प्रार्थना.

धनादेश "स्व"-रूप वर्धिनी या नावाने काढावा ही विनंती. (संस्थेला आयकाराची ८० जी कलमान्वये सवलत प्राप्त आहे.)

**UNIQUE NURSERY**
HORTICULTURISTS, LAND SCAPERS,
GARDEN CONSULTANTS & CONTRACTORS

NEAR THERGAON BRIDGE, CHINCHWAD, PUNE 411 033.
TEL. : NURSERY : 82003, OFF : 84252, 85087, RESI. : 54191

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. एम्. ए. वदूदखान
श्री. जयसिंगभाई मरिवाला
श्री. नानासाहेब पवार
श्री. अविनाश वारदेकर
पद्मश्री अनुताई वाघ

●

## कार्यकारी समिति

**अध्यक्ष**

श्री. पु. व. श्रॉफ

●

**उपाध्यक्ष**

श्री. अ. न. गोगावले

●

**कार्याध्यक्ष**

श्री. कृ. ल. पटवर्धन

●

**सहकार्याध्यक्ष**

श्री. व. ना. दाते

●

**सहकार्याध्यक्षा**

श्रीमती कुंतला मुजुमदार

●

**कोषाध्यक्ष**

श्री. श्री. शं. सामळ

●

**सचिव**

श्री. रा. प. देसाई

●

**सहसचिव**

श्री. शिरीष रा. पटवर्धन

●

**सभासद**

श्री. प्रतापराव पवार
श्री. वा. दे. संचेती
श्री. कां. गि. शहा
श्री. कृ. गो. लवळेकर
प्रा. श्रीमती उष:प्रभा देसाई
श्री. उदय गुजर
श्री. पुखराजजी जैन
सौ. चंद्राताई दलाया

●

## संपर्क

**कार्याध्यक्ष :**

श्री. कृ. ल. पटवर्धन
४२८/२० शिवाजीनगर,
पुणे ४११०१६
दूरध्वनी : ३४५८३५

किंवा

**कार्यवाह :**

श्री. रा. प. देसाई
दूरध्वनी : ६६४३७५
किंवा
श्रीमती कुंतला मुजुमदार
दूरध्वनी : ३४३६०६

**'स्व' रूप वर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ,
सोनावणे पथ,
पुणे - ४११०११
दूरध्वनी : २१७०४

# दैनंदिन शाखांचे पत्ते व कामाच्या वेळा

| | वेळा |
|---|---|
| **१) रामकृष्ण शाखा** | |
| २२/१, मंगळवार पेठ | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ९ |
| पारगे चौक, पुणे ११ | शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३० |
| शाखा प्रमुख - श्री. गणेश राऊत व | रविवार स. ७.३० ते १०.०० |
| शाखा पालक - श्री. किशोर सोंडूर | |
| **२) विवेकानंद शाखा** | |
| भारतीय विद्याभवनचे छाब्रिया स्कूल, | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते ८.३० |
| शिवाजीनगर, पुणे १६ | शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३० |
| शाखा प्रमुख - श्री. दत्ता शेडगे | रविवार स. ७.३० ते १०.०० |
| **३) अखंडानंद शाखा** | |
| कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३० |
| बिबवेवाडी, पुणे - ३७ | शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३० |
| शाखा प्रमुख - श्री. संजय तांबट | रविवार स. ७.३० ते १०.०० |
| **४) भगिनी निवेदिता शाखा** | |
| आगरकर मुलींचे विद्यालय, | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३० |
| रास्ता पेठ, पुणे ११ | शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३० |
| शाखा प्रमुख - सौ. बागेश्री पोंक्षे व कु. मनीषा बोईण | रविवार स. ७.३० ते १०.०० |
| **५) कार्यालय वेळ :** | सोम. ते शनि. स. ११ ते ५ |
| **६) आजोळ वेळ :** | सोम. ते शुक्र. दु. १ ते ५ |